पुणे दिनांक -३/७/२०१९

# प्रेस नोट

## गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाकडुन भिक्षेक-यांवर कारवाई.

मा. श्री.अशोक मोराळे सो, अपर पोलीस आयुक्त गुन्हे, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे शहर, मा. श्री.भानुप्रताप बर्गे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे २ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक (अतिरीक्त कार्यभार)शिल्पा चव्हाण यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक भोर,सहा.पो.फौज.झांजरे, पो.हवा.देशमुख,पो.हवा.आटोळे,म.पो.हवा स्वामी,पो.ना.जाधव,पो.ना.वंजारी चालक सहा.पो. फौज.शेडगे यांनी पुणे शहरातील मुख्य चौकांमध्ये सिग्नलला उभे राहुन येणारे जाणारे वाहनचालक व नागरिकांकडे भिक्षा मागुन त्यांना उपद्रव करणारे भिक्षेक-यांवर आज दिनांक ०३/०७/२०१९ रोजी कारवाई करणेत आली .

पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण व त्यांचे पथक समर्थ व बंडगार्डन पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग फिरत असताना अनुक्रमे के.ई.एम. हॉस्प्टिलचे समोरील चौकात रोडवर एक महिला व कौन्सील हॉल पोलीस चौकीचे समोरील सिग्नल चौकात एक पुरुष असे येणारे जाणारे वाहन चालकांकडुन व नागरिकांकडुन भीक मागताना आढळुन आले. त्यांना लागलीच वरील पथकाने ताब्यात घेतले व त्यांचे भिक्षा प्रतिबंधक अधिनियम कलम ४ (१) प्रमाणे कारवाई करुन भीक मागणा-या महिलेस समर्थ पोलीस स्टेशन व पुरुषास बंडगार्डन पोलीस स्टेशनचे ताब्यात पुढील कार्यवाहीस्तव देणेत आले आहे.

(शिल्पा चव्हाण)
पोलीस निरीक्षक
विशेष बाल सुरक्षा पथक
गुन्हे शाखा पुणे शहर